# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dte.org.in


**अधिसूचना**

क्रमांक : २अ/एडीएम/आवश्यक प्रमाणपत्रे/२००८/ २८८२

दिनांक : 10 NOV 2008

*विषय : शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील व्यावसायिक पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या राखीव जागांवर प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत*

व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या राखीव जागांवर प्रवेश घेणाऱ्या पात्र मागासवर्गीय उमेदवारांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचा प्रवेश अर्ज सादर करतेवेळी विहित नमुन्यात आवश्यक प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांस प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व मागासवर्गीय उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी खालीलप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमासाठी आवश्यक प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्यात यावी. संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्जाच्या स्वीकृतीच्यावेळी जर आवश्यक प्रमाणपत्रे संबंधित उमेदवार सादर करु शकला नाही, तर त्यास संबंधित आरक्षणाचा फायदा मिळणार नाही व त्याची सर्व जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | मागासवर्गीय प्रवर्ग | आवश्यक असलेली मूळ प्रमाणपत्रे | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | जात प्रमाणपत्र * | जात वैधता प्रमाणपत्र # | नॉन-क्रिमी लेअर प्रमाणपत्र @ |
| १ | अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि वास्तुशास्त्र पदवी | SC, ST | आवश्यक | आवश्यक | लागू नाही |
| | | VJDT/NT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC, SBC | आवश्यक | आवश्यक | आवश्यक |
| २ | हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी तसेच एमबीए / एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी | SC, ST | आवश्यक | शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी आवश्यक | लागू नाही |
| | | VJDT/NT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC, SBC | आवश्यक | शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी आवश्यक | आवश्यक |

* <u>जात प्रमाणपत्र (Caste Certificate) :</u> महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी सदर जात महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या अधिकृत यादीमध्ये मोडत असल्याचे संबंधित विद्यार्थ्याच्या नावे दिलेले जात प्रमाणपत्र.

# <u>जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) :</u> महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित विद्यार्थ्याच्या नावे दिलेले जात वैधता प्रमाणपत्र.

@ <u>नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र :</u> महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१७/मावक५, दि.३०/०६/२००६ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त VJ/DT(A)/NT(B)/NT(C) /NT(D)/OBC/SBC या सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटाचे (नॉन क्रिमी लेअरचे) तत्व लागू केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी दिलेले दि. ३१/०३/२०१० पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)

**<u>उपरोक्त आवश्यक ती प्रमाणपत्रे उमेदवार/पालकांनी दि.१० जून २००९ पर्यन्त तयार ठेवावीत. सदर प्रमाणपत्रापैकी जर एखादे प्रमाणपत्र नसेल तर संबंधित उमेदवार त्याबाबतच्या सवलतीस पात्र ठरणार नाही, याची नोंद घ्यावी.</u>**

तसेच शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये व्यावसायिक पदव्युत्तर पदवी व पदवी अभ्यासक्रमांस **प्रवेश घेणाऱ्या सर्व मागासवर्गीय आणि खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना** भारतीय नागरीकत्वाचे प्रमाणपत्र (Indian Nationality Certificate) सादर करणे बंधनकारक आहे.

प्रवेशाबाबतची इतर सर्व माहिती या संचालनालयाच्या **www.dte.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ. सु. का. महाजन)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई